दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

दि. १४/०८/२०२३

विषय : शैक्षणिक वर्ष २०२३– २०२४ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अन्वये सुधारित करण्यात आलेला बी. ए. भाग २ व एम. ए. भाग १ व २ हिंदी विषयाच्या अभ्यासक्रमाप्रमाणे स्वयंअध्ययन साहित्य तयार करणेबाबत.

संदर्भ : १) या केंद्राची दि. ०५/०८/२०२३ रोजीची टिपणी.

२) बी. ए. भाग २ व एम. ए. भाग १ व २ हिंदी विषयाच्या स्वयंअध्ययन साहित्यासंदर्भात आयोजित करण्यात आलेल्या दि. १०/०८/२०२३ रोजीच्या कार्यशाळेचा इतिवृत्तांत

**सादर,**

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडे प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता बी.ए. भाग २, एम.ए. भाग १ व २ हिंदी या पाठयक्रमांचे शैक्षणिक वर्ष २०२३ – २०२४ मध्ये सुधारित झालेल्या अभ्यासक्रमानुसार नवीन स्वयंअध्ययन साहित्य तयार करणेसाठी तसेच यापुर्वीच्या अभ्यासक्रमानुसारचे काही स्वयंअध्ययन साहित्य सुधारित करणेसाठी हिंदी विषयाच्या लेखकांची/तज्ञांची कार्यशाळा उपरोक्त संदर्भ १ मधील टिपणीवरील मान्यतेनुसार दि. १०/०८/२०२३ रोजी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र येथे आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेचा इतिवृत्तांत सोबत जोडला आहे. सदर इतिवृत्तांतास अनुसरुन खालीलप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता असावी.

1. बी.ए. भाग २, एम.ए. भाग १ व २ हिंदी या पाठयक्रमांचे शैक्षणिक वर्ष २०२३ – २०२४ मध्ये सुधारित अभ्यासक्रमाप्रमाणे नवीन स्वयंअध्ययन साहित्य तयार करणेसाठी तसेच यापुर्वीच्या अभ्यासक्रमानुसारचे काही स्वयंअध्ययन साहित्य सुधारित करणेसाठी आयोजित करण्यात आलेल्या दि. १०/०८/२०२३ रोजीच्या कार्यशाळेच्या सोबतच्या इतिवृत्तातांस मान्यता असावी.
2. सदर कार्यशाळेमध्ये निश्चित करण्यात आलेनुसार बी.ए. भाग २, एम.ए. भाग १ व २ हिंदी या विषयाच्या शैक्षणिक वर्ष २०२३ – २०२४ मध्ये सुधारित झालेल्या अभ्यासक्रमाधील खालील पेपरचे स्वयं अध्ययन साहित्य नव्याने तयार करण्यात येईल.

| | |
|---|---|
| १ | बी.ए. भाग २ पेपर ३ आधुनिक हिंदी गद्‌य साहित्य - I पेपर ५ आधुनिक हिंदी गद्‌य साहित्य - II |
| २ | बी.ए. भाग २ पेपर ४ मध्यकालीन एवं आधुनिक हिंदी काव्य पेपर ६ आधुनिक हिंदी काव्य |
| ३ | एम.ए. भाग १ सत्र १ व २ आधुनिक गद्‌य साहित्य |
| ४ | एम.ए. भाग १ सत्र १ व २ भाषाविज्ञान एवं हिंदी भाषा |
| ५ | एम.ए. भाग १ सत्र १ पटकथा लेखन सत्र २ लघुपटनिर्माण |
| ६ | एम.ए. भाग १ सत्र १ विशेष रचनाकार भगवानदास मोरवाल ~~लेखन~~ सत्र २ विशेष रचनाकार कमलेश्वर |
| ७ | एम.ए. भाग १ अनुसंधान प्रविधि और प्रक्रिया |
| ८ | एम.ए. भाग २ सत्र ३ व ४ आधुनिक हिंदी काव्य |
| ९ | एम.ए. भाग २ सत्र ३ व ४ भारतीय साहित्य |

3. इतिवृत्तांतधील मुद्दा क्रमांक २ ला अनुसरुन दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडून यापुर्वीच्या अभ्यासक्रमाप्रमाणे तयार करण्यात आलेल्या खालील स्वयंअध्ययन साहित्याची शैक्षणिक वर्ष २०२३ – २०२४ मध्ये सुधारित झालेल्या अभ्यासक्रमाप्रमाणे पुर्नरचना, संपादन तसेच त्यामध्ये नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या घटकांचे लेखन कार्यशाळेवेळी नियुक्त केलेल्या लेखक व संपादकांकडून करुन घेण्यात येईल.

| | |
|---|---|
| १ | एम.ए. भाग १ सत्र १ व २ हिंदी साहित्य का इतिहास |
| २ | एम.ए. भाग २ सत्र ३ व ४ भारतीय काव्यशास्त्र तथा पाश्यात्य काव्यशास्त्र (सुधारित अभ्यासक्रमामधील पेपर साहित्यशास्त्र) |
| ३ | एम. ए. भाग २ सत्र ३ व ४ प्रयोजनमूलक हिंदी |

.....2

4. उपरोक्त अनुक्रमांक २ व ३ मधील स्वयंअध्ययन साहित्यामध्ये घटक लेखन व संपादन करणाऱ्या लेखक व संपादकांना विद्यापीठ नियमानुसार मानधन आदा करणेस मान्यता असावी.

5. उपरोक्त होणारा खर्च A.59.P.9 Honorarium, Including Co-ordinator Hon. या लेखाशिर्षकामधून करण्यात येईल.

'क' 1) MA II BA II हिंदी विषयाचे सुधारित अभ्यासक्रमानुसार नवीन स्वयंअध्ययन साहित्य व घटक तयार करणे काही स्वयंअध्ययन साहित्याची पुनर्रचना करून संपादन करणेकरीता आयोजित केलेल्या दि. 10.8.2023 च्या कार्यशाळेच्या इतिवृत्तांतास मान्यता असावी
2) प्रस्तुत कार्यशाळेच्या इतिवृत्तांच्या अनुषंगाने अ.क्र. 1 ते 5 प्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता असावी.

कक्ष अधिकारी
17.8.2023

सहाय्यक कुलसचिव
17-08

'क' प्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता असावी.
उपकुलसचिव 17-8

मा.संचालक 18/8/23

मा.प्र.कुलसचिव

मा.प्र—कुलगुरु

मा. कुलगुरु

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

### बी.ए. भाग २, एम.ए, भाग १ व २ हिंदी विषयाच्या दि.१०/०८/२०२३ रोजीच्या कार्यशाळेचा इतिवृत्तांत

शैक्षणिक वर्ष २०२३ – २०२४ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अन्वये सुधारित करण्यात आलेल्या बी.ए. भाग २, एम.ए, भाग १ व २ हिंदी विषयाच्या अभ्यासक्रमाप्रमाणे सदर विषयाचे स्वयं अध्ययन साहित्य तयार करणेसाठी दि. १०/०८/२०२३ रोजी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र येथे सदर विषयाच्या लेखकांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेस मानवविज्ञान विद्याशाखचे अधिष्ठाता प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख, हिंदी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रो. (डॉ.) एस. एस. सावंत, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. (डॉ.) डी. के. मोरे, समन्वयक डॉ के. बी. पाटील, सहाय्यक प्राध्यापक डॉ एन. एस. रणदिवे, डॉ पी. एस. कांबळे व हिंदी विषयाचे लेखक उपस्थित होते.

कार्यशाळेच्या सुरुवातीला दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रांचे समन्वयक डॉ के. बी. पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत करुन कार्यशाळेचे आयोजनाबाबत माहिती दिली यांनतर मानवविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख यांनी उपस्थितांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० बाबत सविस्तर माहिती देवून त्यानुसार तयार करण्यात आलेले अभ्यासक्रम रचनेबाबत मार्गदर्शन केले व सर्व लेखकांनी आपले घटक लेखन दर्जेदार व वेळेत सादर करावे अशी सूचना केली

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. (डॉ.) डी. के. मोरे यांनी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडे प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता स्वयंअध्ययन साहित्याचे महत्व विशद केले तसेच ते वेळेत विद्यार्थ्यांना न उपलब्ध झालेस त्यामुळे दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रास येणाऱ्या अडचणी विशद केल्या. चालू शैक्षणिक वर्षातील हिवाळी सत्रातील परीक्षा माहे ऑक्टोबरमध्ये नियोजित आहे त्यापुर्वी प्रवेशित विद्यार्थ्यांकडून स्वाध्याय व इतर बाबीची पुर्तता करुन घ्यावी लागणार आहे त्यामुळे वरील बदलेल्या अभ्यासक्रमाचे स्वयंअध्ययन साहित्य तातडीने तयार करणे गरजेचे आहे. त्याकरिता सर्व लेखकांनी आपले घटक लेखन निर्धारीत वेळेत या केंद्रास सादर करावे अशी विनंती केली. तसेच उपस्थित लेखकांना कॉपी राईट व लेखन करीत असतांना घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले.

यानंतर हिंदी अभ्यासमंडळाचे अध्यक्ष यांनी प्रा (डॉ.) एस. एस. सावंत यांनी उपस्थितांना शैक्षणिक वर्ष २०२३ – २०२४ मध्ये सुधारित झालेले हिंदी विषयाचे बी.ए. भाग २, एम.ए, भाग १ व २ या पाठयक्रमांच्या अभ्यासक्रमाचे स्वरुप व त्यानुसार अपेक्षित घटक लेखन याबाबत उपस्थित लेखकांना मार्गदर्शन केले.

तद्नंतर अधिसभा सदस्य डॉ सुनिल बनसोडे यांनी घटक लेखनाचे स्वरुप, संदर्भ साहित्य, घटक लेखनाची भाषाशैली याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यानंतर बी.ए. भाग २, एम.ए, भाग १ व २ हिंदी विषयाच्या खालील पेपरचे स्वयं अध्ययन साहित्य तयार करण्याचे निश्चित करुन त्याच्या लेखन व संपादनासाठी लेखक व संपादक नियुक्त करण्यात आले कार्यशाळेवेळी खालील बाबी सर्वानुमते निश्चित करण्यात आल्या.

1. शैक्षणिक वर्ष २०२० – २०२१ मध्ये सुधारित करण्यात आलेल्या बी.ए. भाग २, एम.ए. १ व २ हिंदी विषयाच्या अभ्यासक्रमामधील खालील पेपरचे स्वयं अध्ययन साहित्य नव्याने करण्याचे निश्चित करण्यात आले

| | |
|---|---|
| १ | बी.ए. भाग २ पेपर ३ आधुनिक हिंदी गद्य साहित्य - I पेपर ५ आधुनिक हिंदी गद्य साहित्य - II |
| २ | बी.ए. भाग २ पेपर ४ मध्यकालीन एवं आधुनिक हिंदी काव्य पेपर ६ आधुनिक हिंदी काव्य |
| ३ | एम. ए. भाग १ सत्र १ व २ आधुनिक गद्य साहित्य |
| ४ | एम. ए. भाग १ सत्र १ व २ भाषाविज्ञान एवं हिंदी भाषा |
| ५ | एम. ए. भाग १ सत्र १ पटकथा लेखन सत्र २ लघुपटनिर्माण |
| ६ | एम. ए. भाग १ सत्र १ विशेष रचनाकार भगवानदास मोरवाल ~~लेखन~~ सत्र २ विशेष रचनाकार कमलेश्वर |
| ७ | एम. ए. भाग १ अनुसंधान प्रविधि और प्रक्रिया |
| ८ | एम. ए. भाग २ सत्र ३ व ४ आधुनिक हिंदी काव्य |
| ९ | एम. ए. भाग २ सत्र ३ व ४ भारतीय साहित्य |

2. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडून यापुर्वीच्या अभ्यासक्रमाप्रमाणे तयार करण्यात आलेले खालील स्वयंअध्ययन साहित्याची शैक्षणिक वर्ष २०२३ – २०२४ मध्ये सुधारित झालेल्या अभ्यासक्रमाप्रमाणे पुर्नरचना करण्यात यावी असे निश्चित करण्यात आले याकरिता संपादकांची नियुक्ती करण्यात आली. तसेच आवश्यक त्या घटकलेखनासाठी लेखक नियुक्त करण्यात आले.

| | |
|---|---|
| १ | एम. ए. भाग १ सत्र १ व २ हिंदी साहित्य का इतिहास |
| २ | एम. ए. भाग २ सत्र ३ व ४ साहित्य शास्त्र (सदर पेपरसाठी यापुर्वीच्या अभ्यासक्रमाप्रमाणे तयार करण्यात आलेले भारतीय काव्यशास्त्र तथा पाश्चात्य काव्यशास्त्र या स्वयंअध्ययन साहित्याची पुर्नरचना करावी. ) |
| ३ | एम. ए. भाग २ सत्र ३ व ४ प्रयोजनमूलक हिंदी |

3. कार्यशाळेवेळी नियुक्त सर्व लेखकांनी आपले घटक लेखन दि. ३०/०८/२०२३ पुर्वी दूर शिक्षण केंद्राकडे जमा करावे

कार्यशाळेच्या शेवटी श्री पी. एस. कांबळे यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यशाळा समाप्त झाल्याचे घोषित केले.

(श्री पी. एस. कांबळे)
हंगामी सहाय्यक प्राध्यापक हिंदी

(डॉ नितीन रणदिवे)
हंगामी सहाय्यक प्राध्यापक बी.ए.

प्रो. (डॉ.) एस. एस. सावंत
अध्यक्ष, हिंदी अभ्यासमंडळ
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र (SLM)
दि. ०५/०८/२०२३

विषय : शैक्षणिक वर्ष २०२३– २०२४ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अन्वये सुधारित करण्यात आलेला बी. ए. भाग २ व एम. ए. भाग १ व २ हिंदी विषयाचा अभ्यासक्रम व स्वयं अध्ययन साहित्याबाबत.

संदर्भ : १) प्रो. (डॉ.) एस. एस. सावंत, अध्यक्ष, हिंदी अभ्यासमंडळ यांचे दि.०५/०८/२०२३ रोजीचे पत्र.
२) या केंद्राची दि. २४/०७/२०२३ रोजीची टिपणी.
३) या केंद्राची दि. २६/०७/२०२३ रोजीची टिपणी.

**सादर,**

शैक्षणिक वर्ष २०२३ – २०२४ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित करण्यात आलेले बी. ए. भाग २, एम. ए. भाग १ व २ या पाठयक्रमाचे अभ्यासक्रम व दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडून यापुर्वीच्या अभ्यासक्रमाप्रमाणे तयार करण्यात आलेले वरील पाठयक्रमांचे स्वयंअध्ययन साहित्य यांची पडताळणी संबधित विषयाच्या अभ्यासमंडळ अध्यक्षांकडून करुन घेवून त्यांच्या अभिप्रायानुसार पुढील कार्यवाही करणेस उपरोक्त संदर्भ क्रमांक २ व ३ च्या टिपणीन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार हिंदी विषयाचे यापुर्वीच्या अभ्यासक्रमानुसार तयार करण्यात आलेले स्वयंअध्ययन साहित्य व सुधारित अभ्यासक्रम यांची पडताळणी हिंदी अभ्यासमंडळाचे अध्यक्ष प्रो. (डॉ) एस. एस. सावंत यांचेकडून करुन घेण्यात आली असून त्याबाबतचा अभिप्राय डॉ. सावंत यांनी उपरोक्त संदर्भ क्रमांक १ अन्वये सादर केला आहे. सदर अभिप्रायाबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता असावी.

1. प्रो. (डॉ.) एस. एस. सावंत यांच्या अभिप्रायास अनुसरुन बी.ए. भाग २, एम.ए. भाग १ व २ हिंदी विषयाचे शैक्षणिक वर्ष २०२३ – २०२४ मध्ये सुधारित झालेल्या अभ्यासक्रमानुसार नवीन स्वयंअध्ययन साहित्य तयार करणेसाठी तसेच यापुर्वीच्या अभ्यासक्रमानुसारचे काही स्वयंअध्ययन साहित्य सुधारित करणेसाठी हिंदी विषयाच्या लेखकांची कार्यशाळा प्रो. (डॉ.) सावंत यांचेकडून लेखकांची यादी व कार्यशाळेची तारीख व वेळ प्राप्त झालेनंतर दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र येथे आयोजित करणेस मान्यता असावी.

2. वरील कार्यशाळेकरिता उपस्थित राहणाऱ्या सदस्यांना विद्यापीठ नियमानुसार प्रवास भत्ता व दैनिक भत्ता देणेस तसेच सदरपैकी जे सदस्य कार्यशाळेस उपस्थित राहण्याकरिता स्वत:च्या/भाडोत्री वाहनाने प्रवास करतील व आपल्या देयकासोबत विद्यापीठाच्या सुरक्षा विभागाकडून देण्यात येणारा गेट पास सादर करतील अशा सदस्यांच्या कार प्रवासास मान्यता असावी.

3. उपरोक्तवर होणारा खर्च A.59.P.17 Meeting Expenses या लेखाशिर्षकामधून करण्यात येईल.

4. प्रो. (डॉ.) एस. एस. सावंत यांच्या अभिप्रायास अनुसरुन बी.ए. भाग २, एम.ए. भाग १ व २ हिंदी विषयाच्या शैक्षणिक वर्ष २०२३ – २०२४ मध्ये सुधारित झालेल्या अभ्यासक्रमानुसार सदर पाठयक्रमांचे स्वयंअध्ययन साहित्य नव्याने तयार करण्यात येत असून यापुर्वीच्या अभ्यासक्रमानुसारचे स्वयंअध्ययन साहित्याच्या प्रती शिल्लक असलेस त्या विद्यार्थ्यांना वितरीत न करणेबाबत दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या सर्व अभ्यासकेंद्राना परिपत्रकान्वये कळविण्यात येईल.

१ ते ४ मान्यतेसाठी सादर

कक्ष अधिकारी

सहाय्यक कुलसचिव

उपकुलसचिव

मा.संचालक

मा.प्र.कुलसचिव

मा.प्र–कुलगुरु

मा. कुलगुरु